# महाराष्ट्राचे संगीत

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - मराठी जगत्, संपा. मधु मंगेश कर्णिक, जागतिक मराठी परिषद, मुंबई, ऑगस्ट १९८९)

महाराष्ट्राची गेल्या चाळीस वर्षांची सांगीतिक कमाई काय असा प्रश्न उभा केल्यास (खरे म्हणजे असे अडचणीचे प्रश्न शक्यतो विचारू नयेत!) दोन तऱ्हेची उत्तरे येतात. तत्काळ येणारे उत्तर काहीसे निराशाजनक व विचारान्ती येणारे उत्तर आशावादी असते.

संगीत नाटके मरणप्राय, तमाशा-लावणी विसरल्यात जमा, 'गाण्या'च्या कविता दुर्बळ, नव्या चित्रपटसंगीतात आकर्षणापेक्षा विकर्षणाची हजेरी, वाद्यसंगीतात तबल्याशिवाय इतरांची गैरहजेरी, कंठसंगीतात पुरुष-आवाज हाताच्या बोटांवर मोजण्याइतके, भक्तिसंगीतात मिळमिळीत पांढरपेशेपणाचा 'अतिशयो', संगीतविषयक लिखाणात व संशोधनात पुस्तकीपणाचा गुदमरविणारा वास, दूरदर्शनादि माध्यमांद्वारा प्रसारित संगीतातील नकलीपण, आधुनिक यंत्रविज्ञान, अभ्यासक्रम व सांगीतिक वारसा एकत्र आणण्याच्या प्रयत्नांतला वाढता निरुत्साह, सांगीतिक ठेवा जतन करा असा घोष करणाऱ्या व्यक्ती/संस्थांच्या प्रयत्नांना तज्ञ चिकाटीपेक्षा तीव्र उत्साहाचे लाभलेले पाठबळ, सरकारी-निमसरकारी संस्थांना संगीतास प्रोत्साहन (म्हणजे काय?) देण्याची सुटलेली घाई, आणि खरोखर पैसा आहे की संभ्रम निर्माण होण्यासारखा दात्यांकडून मिळणारा दुतोंडी प्रतिसाद... यादी हवी तेवढी वाढविता येईल! पण तसे करण्याची आवश्यकता नाही. प्रश्न इतकाच विचारावयाचा : हे आणि इतकेच खरे आहे का? निराशाजनक चित्रकारी खरी नसल्यास खरी परिस्थिती काय दर्शविते? राष्ट्राच्या, संस्कृतिगटाच्या सांस्कृतिक वाटचालीचे सिंहावलोकन कसे करावे? निकष काय आणि निष्कर्ष काय?

राष्ट्रांच्या जीवनरेषा वाचताना चूक होते ती अशी की मानवी आयुष्याच्या जीवनमर्यादेची (जीवेत् शरदः शतम्) मोजमापे मनात ठेवून आपण यशापयश, प्रगति-अधोगती, संपन्नता, दारिद्र्याचे आलेख काढू लागतो. सर्व सृष्टीचे व्यापार आणि विश्वाचे सर्व व्यवहार मानवाला केंद्रस्थानी कल्पून आकळू पाहणे योग्य नव्हे याची जाणीव निदान अंतराळ-अवकाश युगात सहज उमलावी! भारतीय संस्कृतिविचारात शतकांची नव्हे तर युगांची भाषा वापरली जाई. कृत-द्वापार-त्रेता-कलि युगे आठवावीत आणि दिवसरात्रीच्या परिचित दुचाकीचे पौराणिक अर्थ ध्यानात घ्यावेत, म्हणजे संस्कृतिविचारात ४० वर्षं ४० पळांच्यासुद्धा वजनाची नव्हेत असा बोध होईल. सकाळच्या चहाची चव कमीजास्त झाल्याने सबंध दिवस वाईट जाणार/गेला अशा निर्णयास पोचणे अंधविश्वासात जमा होते! ४० वर्षांत काय साधले यावरून 'मरीजकी हालत बुरी है' अशा निर्णयास येण्याचे स्वातंत्र्य नाही. दुसरे म्हणजे संज्ञापनमाध्यमांच्या स्फोटक्रियेमुळे अवकाश-काल-कार्यकारणकाळात गुणात्मक बदल होऊ पहात आहेत. अंतरे कमीजास्त होत आहेत, काळाचा संकोच होत आहे, पण अनुभवाची तीव्रता व घनता वाढत आहे. स्त्री-पुरुष भेद व नाती आपले स्वरूप बदलत आहेत. समाजाचे नवे स्तरीकरण होत आहे. (थर जाऊन सर्व समान वगैरे होत असल्याचे भ्रामक विधान विसरलेले बरे!) म्हणून वेगवेगळ्या कला वेगवेगळ्या वेगाने, अंगाने व प्रकाराने बदलत आहेत. अनेक कारणांनी संगीत उशिरा बदलते व आगळ्या प्रकारे बदलते हे भान न ठेवता सांगीतिक वाटचालीची तपासणी करता येणार नाही. आणि शेवटचे सूत्र म्हणजे, कोणत्याही कलेविषयी सांस्कृतिक निष्कर्ष काढावयाचा तर केवळ कलात्मक निष्कर्ष वापरून चालत नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. प्रसिद्ध कवी व काव्यज्ञ टी. एस. इलिअटने 'What is literature can only be decided by literary standards but what is great literature can hardly be determined by literary standards alone'. कुठेतरी म्हटले होते, भावार्थ मनात मुरविण्यासारखा आहे. चाळीस वर्षांत संगीताचे महाराष्ट्रात काय झाले या पृच्छेचे उत्तर शोधताना संगीतशास्त्रीय नव्हे तर संस्कृतिसंगीतशास्त्रीय निकष लावले पाहिजेत. याशिवाय

सांगीतिक घटनांचा अर्थ लावणे दुरापास्त ठरेल. एवढ्या सूत्रमय पार्श्वभूमीवर पुढील मुद्दे तपासल्यास हाती घेतलेल्या विचारास चालना मिळेल.

**महानगरीय...**

महाराष्ट्रातले संगीत गेल्या ४० वर्षांत झपाट्याने आणि सर्वंकषपणे **महानगरीय** होत आहे. म्हणजे काय?

महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येचे प्रमाण सर्वांत जास्त आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात संस्थाने, देवस्थाने, नाटकमंडळ्या, सरदार-दरकार, धनिक-सावकार वगैरेंचा आश्रय संगीतकारांना मिळत असे. तो बंद झाल्यामुळे वा त्याचे प्रमाण कमी झाल्याने स्वातंत्र्योत्तर काळात मुंबई या महानगराकडे कलाकारांचा ओढा राहिला. परिणामतः आश्रयाचे विकेंद्रीकरण जवळजवळ संपले म्हटल्यास हरकत नाही. शिवाय जे कलाकार मुंबानगरीत नसतात त्यांचेही आविष्कार महानगरीत जे होत असते त्यावर बेतले जाऊ लागले. निदान त्यांचा प्रयत्न आपण अद्ययावत - म्हणजे मुंबईसारखे - असावे या दिशेने चाललेला दिसतो. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी म्हणण्यासारखी १९ संस्थाने होती. सुमारे ३२ देवस्थाने, ३४ उत्सव, ८ पेक्षा अधिक धर्मपंथ आजही आहेत. पण या सर्वांकडून संगीतादी कलांना पूर्वी मिळणारा आश्रय खासकरून स्थानमहात्म्यास धरून असे. आता तसे न राहिल्याचा संशय येतो. प्रादेशिक खासियतींच्या ऐवजी आता महानगरी आविष्कारांच्या स्थानिक नकला (किंवा फार झाल्यास प्रामाणिक आकृत्या) निघत राहतात! हे प्रमाणीकरण नव्हे, तर सैनिकीकरण होय! सांस्कृतिक बाबतीत यासारखा दुसरा शाप नाही. महानगरी संस्कृती अधिकांत अधिक प्रमाणात बहुसांस्कृतिक प्रवाहांचे 'जंक्शन' असते. जंक्शन म्हणजे एकत्र येण्याची जागा - तो संस्कृतिसंगम असेलच असे नाही! मुद्दा असा की महानगरी आविष्कार कोणत्याही एका संस्कृतिगटाशी आंतरिक जवळीक न सांगण्याची संभवनीयता जास्त. आणि म्हणून त्यांचे अनुकरण चालू ठेवल्यास प्रादेशिक, भाषिक, सांस्कृतिक वैशिष्ट्ये गमावण्याची शक्यता अधिक. ज्याप्रमाणे मध्यमवर्गाचा सांस्कृतिक स्पंज वा बफर न राहिल्यास सांस्कृतिक घडामोडींच्या सुरळीतपणात अडथळा निर्माण होतो, त्याच चालीवर खेडी व महानगरे यांच्या दरम्यान स्व-भाव न पाळणाऱ्या नगरांविना सांस्कृतिक अभिसरण थांबते. आश्रयाचे विकेंद्रीकरण हा त्यावरचा प्रधान उपाय होय. अंतर्भागी जाऊन कार्य करू पाहणाऱ्या संस्था/व्यक्ती आता दिसू लागल्या आहेत हे लक्षणीय व दिलासा देण्यासारखे वाटावे.

**आंतरिक घाई...**

गेल्या ४० वर्षांत जे संगीतकार नावारूपाला आले आहेत त्यांची घडण मुख्यतः स्वातंत्र्यपूर्व काळात होत होती. आज सुमारे पन्नाशीच्या आसपास रेंगाळणारे कलाकार इथे आठवावेत. याउलट आज, म्हणजे १९८९ साली पस्तिशीच्या आसपासच्या कलाकारांची जडण-घडण स्वातंत्र्योत्तर म्हणता येईल. बहुतेक सर्वसामान्य विधानांना निरपवादपणे वेढणाऱ्या सरसकटपणाचा धोका पत्करूनही असे म्हणता येईल की या दोन संगीतकारवर्गांतला ठळक फरक नावारूपाला येण्याबाबतच्या कलाकारांच्या दृष्टिकोणाचा आहे. स्वातंत्र्योत्तर सिद्ध वर्ग बऱ्याच प्रमाणात आंतरिक घाईने पीडित वाटतो! तिशी-पस्तिशीत पूर्णतः स्वतंत्रपणे व्यवसायास लागावे, चाळिशीत तयार व्हावे, पन्नाशीत प्रगल्भता गाठावी व साठीपासून बुजुर्गाईच्या स्वानंदी वाटेस लागावे हा पूर्वीचा आकृतिबंध होता. तुलनेने पाहता आज सर्वच टप्पे दहा-बारा वर्षे अलीकडे आणण्याची धडपड दिसते! औषधे मारून पिकण्याचा वेग वाढवावा, खतांचा मारा करून पिकाचे वजनमान भारी करावे आणि कायदा बाजार-तंत्रे राबवून नागरी फायद्याचे प्रमाण जादा ठेवावे या चालीवर थोड्या व वेगवेगळ्या गोष्टी 'घ्याव्या', अनेक गुरू सेवेस लावून आपला पोषकवर्ग आणि मुलाखत सत्कार-प्रसिद्धीच्या कुशल फुगवट्यातून

आपले मोठेपण सिद्ध करण्याचा अट्टहास दिसतो! दीक्षा-शिक्षा-परीक्षा अशा तीन चाळण्यांमधून संगीतकाराने आपली साधना तावून-सुलाखून घेतली पाहिजे. तसे होताना दिसत नाही. अपुरी विद्या व कार्यक्षम सादरीकरण असे रसायन तयार करण्याचा दुर्दैवी प्रयत्न वाढीवर आहे. चूक-भूल द्यावी-घ्यावी पण विद्यागुरू निवडण्याऐवजी 'तरुण' संगीतकार परिणामकारक पंथगुरूच्या शोधात असतात असे म्हणावेसे वाटते! गुरूंऐवजी शिक्षक आणि शिष्यांऐवजी विद्यार्थी असून प्रयोगकलांत चालत नाही. तो चालविण्याचा कलाकारांचा दुराग्रह आंतरिक घाईपोटी महाराष्ट्रात जन्माला येत आहे. याची खंत जास्त वाटते. कारण संगीतकार होऊ पाहणारा आजचा तरुण निश्चितपणे अधिक कुशाग्र आहे. त्याचे सर्वसाधारण ज्ञान विस्तृत आहे. शिवाय साधनसामुग्रीही मुबलक, विविध आणि सहज उपलब्ध आहे. कमी पडते आहे ते शहाणपण!

**उदंड जाहल्या संस्था...**

जरासे अतिशयोक्तीने बोलावयाचे तर असे म्हणता येईल की भारतीय संगीताची आजची एक प्रमुख 'बीमारी' म्हणजे चहापाण्याची आवड! 'उदंड जाहल्या संस्था चहापाणी करावया'! संगीत शिक्षण, रक्षण, प्रसार करणाऱ्या संस्था प्रत्येक जण प्रेमाने व उत्साहाने काढतो, मग कार्यकर्त्यांची दुसरी पिढी नाही म्हणत म्हणत संस्था कशीबशी चालू ठेवते! सर्वचजण संगीतास सर्वच बाबतींत तारणार म्हणून प्रतिज्ञा करते झाले तर संगीताचे काय व्हावे! शिक्षण, रक्षण, प्रसार इत्यादी सर्व कार्ये विशेष तज्ज्ञतेची आहेत. हौसेपोटी या गोष्टी करता येत नाहीत. व्यावसायिक (धंदेवाईक नव्हे) दृष्टिकोणाअभावी प्रस्तुत कार्ये हाती घेतल्यामुळे आज काम पार पाडले पण कार्य सिद्धीस जाऊ नये असे होते. वर्षाकाठी इतके कार्यक्रम, इतका पैसा, इतके कलाकार वगैरे सर्व हिशेब जमून वर्षाच्या शेवटी अहवाल प्रस्तुत होतो... पण इतकेच.

संस्था फार झाल्यामुळे असे होते काय? व्यक्तींना (आणि प्रामुख्याने विशेषाभ्यासी व्यक्तींना) संस्थांपेक्षा कमी लेखण्यामुळे दुरवस्था ओढवते काय? (अजूनही) भारतात संस्थारूपापेक्षा व्यक्तिरूप भरीव कामगिरीस पोषक आहे असा निष्कर्ष काढावा काय? की संस्थांची कार्यक्षेत्रे अधिक नेमकेपणे निश्चित व्हावीत व उद्दिष्टांचा निश्चित पाठपुरावा व्हावा म्हणून संस्था-जीवनाची नव्याने आखणी करावी? शासनाची भूमिका काय असावी? संगीतच नव्हे तर इतर प्रयोगकलांबाबतही बोलावयाचे तर संबंधित संस्था-जीवनाचा विचार खातेनिहाय न होता प्रक्रियेनुसार व्हावा असे मला वाटते. म्हणजे असे की शिकविणे, सादरीकरण, व्यवस्थापन, रक्षण, प्रसार व संशोधन इत्यादी प्रक्रिया आहेत. त्यांनुसार अधिकारीवर्ग, संस्था, धनपुरवठा व विचार व्हायला हवा. अर्थात याविषयी अधिक चर्चा आवश्यक. आज शासन, निमसरकारी संस्था आणि औद्योगिक घराणी 'संगीतातील घराणी' आपापल्या कार्याचा विषय मानतात ही जमेची बाजू आहे. आश्रयदाता म्हणून आपापली जबाबदारी स्वीकारत असल्याचे ते लक्षण होय. पण या सर्वांनी आपले प्रबोधन करून घ्यायला हवे. अजाण सावकाराने हमखास बुडित ठरणाऱ्या कुळास आग्रहाने कर्ज द्यावे असे घडू नये! त्यापासून कोणाचाच फायदा होत नाही. संस्था हव्यात पण व्यक्तींच्या ध्यासाची पर्वा करणाऱ्या, आणि व्यक्ती हव्यात पण आपले नश्वरत्व व संस्थारूपाचे टिकाऊपण मान्य करणाऱ्या - अशी आजची यक्षमागणी आहे.

**जनानीपण जोरावर ...**

गेल्या संगीतचाळिशीत जनानीपण जोरावर आहे. स्त्री-कलाकार बहुसंख्य व अधिक यशस्वी आहेत इतकेच नव्हे तर पुरुष कलाकारांनीच आजपर्यंत सादर केलेले प्रकार, प्रयुक्त केलेली वाद्ये त्यांनी समर्थपणे सामोरी आणली आहेत. मात्र याहीपेक्षा महत्त्वाची घटना अशी की परंपरेने स्त्रीसुलभ म्हटल्या जाणाऱ्या प्रयोगविशेषांची पुरुष कलाकारांकडून वाढती योजना होऊ लागली आहे. आवाजाचा लगाव; नक्षीकामाचा भर; नखरेलपणाचा सहेतुक वापर; माधुर्याचे मूर्धन्य स्थान; हातवारे, पोषाख इत्यादींचा 'प्रतिमा'

तयार करण्याच्या दृष्टीने दक्ष उपयोग, यांसारख्या गोष्टी इथे आठवाव्यात. या व तत्सम विशेषांचा पूर्वी अगदीच आढळ नव्हता असे अर्थातच सुचवायचे नाही. सर्व कलांतील प्रत्येक कलाकार कमी-अधिक प्रमाणात मर्दानी-जनानीपणाचे मिश्रण असतोच! कलेच्या अंतःरूपातच अर्धनारीनटेश्वरी बाज मुरलेला असतो. पण आज (अनेक कारणांमुळे) पुरुष कलाकार जनानी होत आहेत. बंदिस्त प्रयोगगृहांचे ध्वनिशास्त्रीय गुणधर्म, सार्वजनीन प्रक्षेपण जुळण्याच्या योजनेमागील कल्पकतेचा सर्वसाधारण अभाव, दूरदर्शनी मनोभूमिकेच्या व्यापक आढळामुळे दृश्याची चौकट रम्य ठेवण्यावरचा कटाक्ष वगैरे इतर कारणांचाही प्रस्तुत संदर्भात विचार कर्तव्य आहे इतके सुचविणे पुरे आहे.

**केल्याने देशाटन**

गेल्या चार दशकांत देशाटनावरचा विश्वास वाढला आहे! बहुतेक वेळा बहुतेक कलाकार परद्वीपस्थ भारतीयांना आपले(च) संगीत ऐकवून येतात. काही थोडे परकीयांना अतिगौरवी चौकटीतून ऐकवून आपला जम बसविण्याच्या धडपडीत राहतात. फारच थोडे सांस्कृतिक देवघेवीत आस्था ठेवून काम करतात. संगीतप्रसारास या तिन्ही तऱ्हेच्या देशाटनाने कमी-अधिक अस्सल मदत होते इतके सांगणे पुरे! मुद्दा थोडा वेगळा आहे. अजूनही गोऱ्यांच्या देशांत ज्याची तारीफ होते त्याला भारतात मान जास्त अशी परिस्थिती आहे! ही परिस्थिती शरमेची म्हटली पाहिजे. आमच्या संगीतकारांना पडणारा समुद्रापारच्या वारीचा मोह भारतवासीय भारतीयांच्या संवेदनशीलतेविषयी शंका निर्माण करतो हे निश्चित. प्रयत्न व्हायला हवा तो देशाटने आशयपूर्ण करण्याकरिता (अर्थपूर्ण नव्हेत!). भारतीय संगीतकारांइतके (आणि यात महाराष्ट्रीय प्रामुख्याने आले) इतर संगीतपद्धतींना विन्मुख दुसरे विरळा. ही परिस्थिती बदलायला हवी. देशाटनांमुळे आमचा संगीतकार अधिक 'संगीतपर' झाला तर हवे आहे. नाहीतर पं. भीमसेन जोशी एकदा म्हणाले होते - "कावळेसुद्धा परदेशी जातात!"

हिंदुस्थानी संगीताच्या प्रभावक्षेत्रात राहणे महाराष्ट्राने १४ व्या शतकापासून पसंत केले. त्यानंतर ब्रिटिश सत्तेखालच्या भारतात पाश्चिमात्य संगीताचा अभ्यास करणारे महत्त्वाचे केंद्र मुंबईनेच पुरविले. चित्रपटसंगीताची पाणपोई मुंबापुरीतलीच. तेव्हा संगीताबाबत महाराष्ट्र संकुचित कसे म्हणावे? पण चाळीस वर्षांत आपले व नवीन अशा दोहोंचा समन्वय घडविण्यात महाराष्ट्र यशस्वी झाला असे म्हणता येणार नाही. सर्व तऱ्हेची अनुकूलता लाभलेल्या संस्कृतिगटाकडून अधिक अपेक्षा असल्या तर ते वावगे कसे म्हणावे? मात्र कोणकोणत्या शक्ती कार्य करीत आहेत ते पाहिल्यावर उमेद वाढते, कारण शक्तींत एक महत्त्वाचा गुण आहे : नविनाला धुंडाळण्याचा. जो प्रश्न विचारत नाही तो संपतो. आजचा महाराष्ट्र प्रश्न विचारण्यात कुचराई करत नाही!